# घटक - दुय्यम न्यायालये

⇒ कनिष्ठ न्यायालये असेही म्हणतात.

⇒ उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली - जिल्हास्तरावर किंवा त्याखालील स्तरावर.

* घटनात्मक तरतुदी ⇒ भाग ६ मधील कलम २३३ ते २३७

## ① जिल्हा न्यायाधिशांची नियुक्ती :

उच्च न्यायालयाशी विचार विनिमय करून राज्यपाल राज्यातील जिल्हा न्यायाधिशांची नियुक्ती, पदनियुक्ती, आणि पदोन्नती करतो.

**पात्रता :**
① केंद्र सरकार किंवा राज्य सरकारच्या सेवेत नसावी.
② सात वर्षे वकीलीचे काम केलेले असावे.
③ नियुक्तीसाठी उच्च न्यायालयाने शिफारस करायला हवी.

## ② इतर न्यायाधिशांची नियुक्ती :

राज्यपाल राज्य लोकसेवा आयोग व उच्च न्यायालय यांच्याशी विचारविनिमय करून जिल्हा न्यायाधिश सोडून राज्याच्या न्यायीक सेवेतील इतर व्यक्तींची नियुक्ती करतो.

* अन्वयार्थ - जिल्हा न्यायाधिश या संज्ञेत.

① नागरी दिवाणी न्यायालय
② अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश
③ संयुक्त जिल्हा न्यायाधिश
④ सहायक जिल्हा न्यायाधिश
⑤ लघुवाद न्यायालयाचा मुख्य न्याया.
⑥ मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी
⑦ अतिरिक्त मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी
⑧ सत्र न्यायाधिश
⑨ अतिरिक्त सत्र न्यायाधिश
⑩ सहायक सत्र न्यायाधिश

## * संरचना आणि अधिकारक्षेत्र

राज्ये संरचना, अधिकारक्षेत्र व त्यांचे नामाभिधान ठरवतात.

उच्च न्यायालय
↓
जिल्हा व सत्र न्यायाधिशांची न्यायालये

- दिवाणी
  - दुय्यम न्यायाधिशाचे न्यायालय.
    - मुन्सिफचे न्यायालय
- फौजदारी
  - मुख्य न्यायिक दंडाधिकाऱ्याचे न्यायालय
    - न्यायिक दंडाधिकाऱ्याचे न्यायालय.

Scanned by CamScanner

① * जिल्हा न्यायाधीश: जिल्ह्यातील सर्वात वरिष्ठ न्यायीक अधिकारी.
त्याला दिवाणी व फौजदारी बाबतीत प्रारंभिक आणि पुनर्विचाराचे अधिकार.
म्हणजेच तो सत्र न्यायाधीश सुद्धा असतो.

अधिकार → ① न्यायिक व प्रशासनिक
② जिल्ह्यातील दुय्यम न्यायालयांवर पर्यवेक्षण.
③ त्यांच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपिल करता येते.
④ आजन्म तुरुंगवास व देहदंडाची शिक्षा देण्याचा अधिकार.
(मात्र देहदंडाची शिक्षा उच्च न्यायालयाने निश्चित करावी लागते.)

② दुय्यम न्यायाधीश
दिवाणी दाव्याबाबत अमर्याद आर्थिक अधिकारक्षेत्र.
मुख्य न्यायदंडाधिकारी.
सात वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा असलेले फौजदारी खटले

③ मुन्सिफचे न्यायालय
अधिकार क्षेत्र मर्यादित - छोट्या रकमेचे दिवाणी खटले.
न्याय दंडाधिकारी
तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा असलेले फौजदारी खटले.

## * राष्ट्रीय न्यायिक सेवा प्राधिकरण *

कलम ३९A - गरीब व दुर्बल घटकांसाठी कायदेविषयक नि:शुल्क सहाय्य.
कलम १४ - कायद्यासमोर समानता
कलम २२(१) - समान संधी तत्वावर न्याय देणारी न्याय व्यवस्थेची हमी.

संसदेने १९८७ साली ⇒ न्यायिक सेवा प्राधिकरण कायदा संमत केला.
९ नोव्हेंबर १९९५ पासून अमलात. त्या अंतर्गत राष्ट्रीय न्यायिक सेवा प्राधिकरण स्थापन

⇒ प्रत्येक राज्यात न्यायिक सेवा प्राधिकरण.
⇒ प्रत्येक उच्च न्यायालयात उच्च न्यायालय न्यायिक सेवा समिती.
⇒ जिल्ह्यात जिल्हा न्यायिक सेवा प्राधिकरणे
⇒ व तालुक्यात तालुका न्यायिक सेवा समित्या.
⇒ देशात सर्वोच्च न्यायालय न्यायिक सेवा समिती.

## * लोक अदालत *

अर्थ - जनतेचे न्यायालय
पद्धत - गांधीजींच्या तत्वावर आधारित.
न्यायालयात प्रलंबित असलेले खटले किंवा खटला करण्यापूर्वीच्या पातळीवर असलेले विवाद (न्यायालयापुढे न आणलेले) यावर सन्माननीय तोडगा काढण्यासाठी किंवा त्याचे योग्य निवारण करण्यासाठी स्थापन केलेला मंच.

Scanned by CamScanner

⇒ लवकर व कमी खर्चात न्याय मिळविण्यासाठी पर्यायी व्यवस्था -अनौपचारिक पद्धत.

⇒ कोणीही जेता नसतो कोणीही पराभूत नसतो.

वैधानिक दर्जा -

⇒ पहिले लोक अदालत शिबीर - १९८२ - गुजरात मध्ये.

⇒ न्यायिक सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ ने वैधानिक दर्जा.

कायदा

→ राज्य / जिल्हा न्यायिक सेवा प्राधिकरण / सर्वोच्च, उच्च, तालुका न्यायिक सेवा समिती योग्य वाटेल त्या कालांतराने किंवा ठिकाणी आणि आवश्यक त्या भागासाठी व अधिकार क्षेत्रासाठी - लोक अदालत आयोजित करील

⇒ लोक अदालत मध्ये लोक अदालत संघटित करणारी संस्था ठरविल तितके सदस्य.

* त्या क्षेत्रातील विद्यमान किंवा निवृत्त न्यायिक अधिकारी व इतर
* अध्यक्षपदी न्यायिक अधिकारी
* सदस्य म्हणून वकील व सामाजिक कार्यकर्ते.

⇒ लोक अदालत ला खालील मुद्यावाबत अधिकार क्षेत्र:

अ) कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेला कोणताही खटला

ब) कोणत्याही न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारा आणि न्यायालयापुढे न आलेला विषय.

क) सर्वसामान्यपणे सर्व दिवाणी वाद व तडजोडपात्र फौजदारी खटले.

कोणत्याही कायद्याखाली तडजोड पात्र नसलेल्या अपराधाचा कोणताही खटला किंवा विवाद लोकअदालतच्या अधिकार क्षेत्रात येत नाही.

⇒ खालील परिस्थितीत न्यायालयात प्रलंबित असलेला खटला लोक अदालतकडे सोपविता येतो.

अ) त्यातील पक्षकार लोक अदालत मध्ये विवाद सोडविण्यास तयार आहे. - किंवा

ब) त्यातील एक पक्षकार लोक अदालत कडे खटला सोपवावा असा अर्ज करतो - किंवा

क) हा विषय लोक अदालत मध्ये हाताळण्यास योग्य आहे यावाबत न्यायालयाचे समाधान होणे.

⇒ खटला पूर्व स्थितीत कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्यास.

लोकअदालतला दिलेले दिवाणी न्यायालयाचे अधिकार: दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८

अ) शपथेवर साक्ष घेण्यासाठी कोणत्याही साक्षीदाराला बोलविणे.

ब) कोणतीही कागदपत्रे मिळविणे व सादर करणे.

क) प्रतिज्ञापत्रावर साक्ष नोंदविणे.

ड) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून सार्वजनिक कागदपत्रे मागविणे.

इ) ठरवून दिलेल्या सर्व बाबी.

⇒ लोकअदालत ला स्वत:ची प्रक्रिया ठरविण्याचे अधिकार.

सर्व कामकाज भारतीय दंड संहिता १८६० अनुसार न्यायालयीन कामकाज मानले जाते.

अपराधिक प्रक्रिया संहिता १९७३ अनुसार दिवाणी न्यायालय मानले जाते.

Scanned by CamScanner

⇒ लोक अदालतने दिलेला निर्णय दिवाणी न्यायालयाचा / इतर न्यायालयाचा निवाडा मानला जातो.
हा निर्णय अंतिम आणि पक्षकारांवर बंधनकारक.
त्या निर्णया विरोधात कोणत्याही न्यायालयात अपील करता येत नाही.

⇒ फायदे :
- (i) न्यायालयीन शुल्क नाही. भरले असेल तर विवादाचे निराकरण झाल्यावर परत मिळते.
- (ii) लवचिकता व त्वरित निराकरण.
- (iii) पक्षकार वकिलांमार्फत न्यायाधिशाशी थेट संपर्क साधू शकतात.
- (iv) निर्णय बंधनकारक त्यामुळे विनाविलंब अंतिम निराकरण.

## ✱ कायमस्वरूपी लोक अदालत ✱

न्यायिक सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ मध्ये दुरुस्ती करून
२००२ मध्ये कायमस्वरूपी लोक अदालत स्थापन करण्याची तरतूद.

वैशिष्ट्ये

⇒ अध्यक्ष → विद्यमान जिल्हा न्यायाधिश / अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश / किंवा जिल्हा न्यायाधिशापेक्षा वरिष्ठ न्यायिक पदी काम केलेली व्यक्ती.
सदस्य → सार्वजनिक सेवांमधील अनुभव असणाऱ्या दोन व्यक्ती.

⇒ रु १० लाख या आर्थिक मर्यादेपर्यंतच्या बाबी. (मर्यादा वाढविणे अधिकार केंद्र सरकारला)

⇒ अधिकारक्षेत्रात त्वरित रस्ता, जलमार्ग, डाक, तार, दूरध्वनी, विद्युत, पाणीपुरवठा, आरोग्य इ सेवा.

⇒ कोणत्याही कायद्यानुसार न मिटविता येणारी बाब - या अधिकार क्षेत्रात येत नाही.

⇒ विवाद दाखल करण्यापूर्वी कोणताही पक्षकार अर्ज करू शकतो. तदनंतर कोणताच पक्षकार त्याच विवादासाठी अन्य न्यायालयात प्रकरण चालविण्याची मागणी करू शकत नाही.

⇒ विवादात सहमती झाली नाही तर अदालत तथ्ये विचारात घेवून निर्णय देईल.

⇒ निर्णय अंतिम / सर्व पक्षांवर बंधनकारक / बहुमताने दिलेला असेल.

## ✱ कौटुंबिक न्यायालये ✱

विवाह आणि कौटुंबिक बाबी या संबंधित विवादांचे त्वरीत निराकरण करण्यासाठी कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यासाठी कौटुंबिक न्यायालय अधिनियम १९८४ पारीत.

कारणे :
- (i) सामोपचार.
- (ii) सामान्य दिवाणी प्रक्रियेऐवजी भिन्न दृष्टीकोन वापरून खटला सुरू होण्यापूर्वी तडजोड.
- (iii) त्वरीत निराकरण.

Scanned by CamScanner

**वैशिष्ट्ये :**
(i) राज्य सरकारांनी उच्च न्यायालयाशी विचार विनिमय करून कौटुंबिक न्यायालये स्थापण्याची तरतूद.
(ii) 10 लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक शहरात/गावात असे न्यायालय स्थापन करणे राज्य सरकारवर बंधनकारक
(iii) योग्य वाटल्यास इतर भागातही स्थापन करू शकणार.

**अधिकारक्षेत्र -**
(i) विवाह रद्द ठरविण्यासह वैवाहिक समस्यांवर उपाययोजना, विभक्त होणे, घटस्फोट, सहजीवनाचा अधिकार परत मिळवून देणे किंवा विवाह वैध ठरविणे किंवा व्यक्तीची वैवाहिक स्थिती ठरविणे.
(ii) पती/पत्नी/दोघांची मालमत्ता.
(iii) कोणत्याही व्यक्तीचे औरसत्व ठरविणे.
(iv) व्यक्तीचे पालकत्व किंवा कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीचा कायदेशीर ताबा.
(v) पत्नी, मुले व पालक यांचा निर्वाह.

* या कायद्यानुसार, कौटुंबिक विवादाबाबत सर्वप्रथम दोन्ही बाजूमध्ये तडजोड करणे हे कौटुंबिक न्यायालयावर बंधनकारक - अनौपचारिक कामकाज व कडक नियम नसतील.
⇒ या टप्प्यावर समाजकल्याण संस्था, आणि समुपदेशक, तसेच वैद्यकिय/समाजकल्याण तज्ञ यांचे सहाय्य घेतले जाते.
⇒ हक्क म्हणून कायदेशीर सल्लागार घेण्याचा अधिकार नाही.
एक मित्र म्हणून सल्लागार घेण्यास न्यायालय संमती देवू शकते.
⇒ अपिल करण्याचा एकच अधिकार ⟶ उच्च न्यायालयाकडे

२०१६ अखेर देशात ४३८ कौटुंबिक न्यायालये :
सर्वाधिक - उ.प्रदेश - ७६ - महाराष्ट्र २२.
गोवा, मेघालय, जम्मू काश्मीर, हि.प्रदेश येथे एकही नाही.

*** ग्राम न्यायालये ***

नागरिकांना त्यांच्या दाराशी न्याय मिळावा, न्याय मिळण्यापासून कोणीही वंचित राहू नये या उद्देशाने अगदी खालच्या स्तरावर - न्यायालये स्थापन करण्यासाठी ग्राम न्यायालये अधिनियम 2008 पारित.

**उद्देश:** - सर्वसामान्य नागरिकांना त्वरीत/कमी खर्चात/सर्वंकष न्याय मिळावा.

**वैशिष्ट्ये**
i) पहिल्या दर्जाचे न्यायिक अधिकाऱ्याचे न्यायालय. राज्य सरकार उच्च न्यायालयाशी विचार विनिमय करून पीठासीन अधिकाऱ्याची नियुक्ती.

Scanned by CamScanner

२) मध्यम स्तरावरील प्रत्येक पंचायती मध्ये किंवा पंचायतींच्या गटामध्ये किंवा मध्यम स्तरावर पंचायत नसेल तर लगतच्या पंचायती गटामध्ये.

३) प्रमुखाला उच्च न्याया. अंतर्गत काम करणाऱ्या पहिल्या दर्जाच्या न्यायाधिकाऱ्यासमान वेतन व दर्जा.

४) फिरते न्यायालय — दिवाणी व फौजदारी दोन्ही अधिकार- तसेच कायद्यांच्या परिशिष्ट १ व परिशिष्ट २ मधील बाबीसंबंधी

५) शक्यतो विवाद सामोपचाराने सोडविले जातील

६) दिलेला आदेश न्यायालयीन आदेश मानला जाईल.

७) फौजदारी खटल्यात सत्र न्यायालयात अपिल करता येईल. अपिल केल्यापासून ६ महिन्यां-च्या आत त्यावर सुनावणी घेऊन निवाडा केला जाईल.

८) दिवाणी खटल्यात जिल्हा न्यायालयात ———— " ————

९) अपराधाचा आरोप असलेली व्यक्ती तडजोडीसाठी अर्ज करु शकते.

स्थापना :

* केंद्र सरकारने ग्राम न्यायालये स्थापन करण्यासाठी जादा आवर्ती खर्च करण्याचे ठरवले.
* यामध्ये न्यायालय बांधण्यासाठी रु १० लाख, कार्यालयीन साधनसामग्री ३ लाख, वाहनांसाठी रु ५ लाख, ⟶ एकूण १८ लाखांची तरतूद.
* ग्राम न्यायालये कायदा २००८ नुसार स्थापन करणे.

२०१६ ऑक्टो- देशात एकूण सूचित केलेली ग्राम न्यायालये व कार्यरत ग्राम न्यायालये

| | | |
|---|---|---|
| एकूण | २९१ | १७५ |
| उ. प्रदेश | १०४ | ०२ |
| महाराष्ट्र | २३ | २२ |